# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

५.१ प्रास्ताविक

५.२ प्रकरण १ ते ४ सारांश

५.३ निष्कर्ष

-----

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

## ५.१ प्रास्ताविक :

१९६० नंतर दलित साहित्यिकांनी आपल्या दडपलेल्या भावना, वेदना व्यक्त करण्यासाठी प्रथम कविता व नंतर आत्मकथन हा मार्ग शोधून काढला व पिढ्यान्पिढ्या दबून राहिलेले हुंकार बाहेर पडू लागले. वर्षानुवर्षे गावकुसाबाहेर घुसमटून राहिलेली जमात नवजागृतीच्या अग्निलोळाने आपली झाकोळलेली आयुष्य शब्दबद्ध करू लागली. वर्षानुवर्षे ज्या लेखणीवर अभिजनांनी सत्ता गाजविली त्या सत्तेवर ही मूक पिढी अधिकार सांगू लागली व मराठी साहित्यात एक नवे अनुभवविश्व उमटू लागले. मराठी अभिजात संस्कृतीला हादरा देणारे हे नवसाहित्य म्हणजेच दलित साहित्य होय. 'शब्द' हे शस्त्राचे काम करते या उक्तीवर बाबासाहेबांनी विश्वास ठेवल्यामुळे सर्वच दलित तरूणांनी या शस्त्राचा साधन म्हणून वापर केला व आपल्या दु:खाच्या गाथा वेशीवर टांगल्या. या गाथा म्हणजेच 'दलितांची स्वकथने' होय. 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतून दलित स्त्रीचे दु:ख व तिचे दु:खमय जिणे आपल्यासमोर बेबी कांबळे व शांताबाई कांबळे या लेखिकांनी मांडले. या दोन्ही आत्मकथनांना सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान आहे.

या लघुप्रबंधाची मांडणी पाच प्रकरणात केली आहे. प्रत्येक प्रकरणाचा सारांशरूपाने अभ्यास केला असता त्याची वाङ्मयीन महता लक्षात येते.

## ५.२ प्रकरण एक ते चार सारांश :

दलितसाहित्य व दलित आत्मकथने स्वरूप विशेष : या पहिल्या प्रकरणात आपण दलित शब्दाची संकल्पना, व्याख्या, दलित जाणीव म्हणजे काय ? याचा विचार केला. दलित साहित्य निर्मितीचा हेतू स्वत:ला व स्वसमाजाचा पारंपरिकतेच्या मगरमिठीतून बाजूला करणे हा असून केवळ आत्मचरित्र किंवा आत्मगौरव नाही. तर रंजनापेक्षा समाजव्यवस्थेचे भंजन करणे हा आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी घडविलेल्या वैचारिक सामर्थ्यामुळे स्वभान आलेला हा तरूण आपले अनुभव व्यक्त करू लागला. या आत्मकथन लेखनामध्ये स्त्रियांनीही आपल्या अनुभवांची भर टाकली. याचे प्रत्यंतर 'जिणं आमुच' - बेबी कांबळे व 'माज्या जल्माची चित्तरकथा' - शांताबाई कांबळे यांच्या आत्मकथनाचा अभ्यास केला असता लक्षात येते. दलित लेखिकांनी शैलीविषयी कोणतेही संकेत बाळगलेले नाहीत. अनुभवांची भाषा हीच या आत्मकथनांची शैली आहे. एकूणच १९७८ व १९९८ हा कालखंड दलित आत्मकथनांच्यादृष्टीने वैपुल्याचा कालखंड मानला जातो.

दुसऱ्या प्रकरणात 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' याआत्मकथनांतील सामाजिकता पाहिली. त्याच्या अनुषंगाने साहित्यातील सामाजिकता व दलित साहित्यातील सामाजिकता यांची चर्चा करून या दोन्ही आत्मकथनांतील सामाजिकतेचे स्वरूप व विशेष पाहिले. त्यावरून असे लक्षात येते की, दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतील समाजजीवन प्रातिनिधीक स्वरूपाचे आहे. अस्पृश्यता, अज्ञान, अंधश्रद्धा या तीन महत्त्वाच्या गोष्टींमुळे येथील स्त्रीला गुहाजीवन जगावे लागले. या दोन्ही आत्मकथनांवरून तत्कालीन समाजजीवनावर

जसा प्रकाश पडतो तसा त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीतील विषयताही आपल्या लक्षात येते. या अर्थाने सामाजिकदृष्ट्या दलित कथनाला महत्त्वाचे स्थान आहे.

तिसऱ्या प्रकरणात 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' यातील सांस्कृतिकता अभ्यासली. या दोन्ही आत्मकथनांतील सांस्कृतिकता अभ्यासण्यापूर्वी संस्कृती म्हणजे काय ? व साहित्य व संस्कृती यांचा अन्योन्यसंबंध आपण अभ्यासला. दलित आत्मकथने ही सांस्कृतिक सामाजिक दोन्ही पातळीवर वाङ्मयीनदृष्ट्या मोलाची ठरतात. या प्रकरणात आपक्याला दलित समाजातील रूढी परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा त्यांच्या देवधर्मविषयक भ्रामक कल्पना यांच्याविषयी तर समग्र माहिती मिळतेच त्याशिवाय महार संस्कृती हुबेहुब आपल्यासमोर उभी रहाते. याचे संच या दोन्ही आत्मकथनांना जाते.

चवथ्या प्रकरणात दोन्ही आत्मकथनांतील वाङ्मयीनदृष्ट्या मूल्यमापन काही निकषाच्या आधारे केलेले आहे. त्यासाठी या आत्मकथनांचे शीर्षकाचे महत्त्व, त्याची भाषाशैली, निवेदनशैली, सामाजिक व सांस्कृतिक जाणीव ह्या दोन्ही जाणीवांमधील या आत्मकथनांत असणारे साम्यभेदही तपासून पाहिले. यावरून आपल्या असे लक्षात येते की, सामाजिक व राजकीय उलथापालथीविरूद्ध कोणतीही प्रत्येक कृती करणे शक्य नसते तेव्हा त्याची भावनात्मक व विचारात्मक स्पंदने साहित्यातून प्रकट होतात. दलित साहित्यातील प्रस्फुरणांमागे नेहकी हीच भावना होती. दलित स्वकथने ही तर 'सामुहिकतेच्या भावनेचा शब्दबद्ध हुंकार' म्हणून ओळखली जातात. त्यामुळे ही आत्मकथने एका व्यक्तीपुरती मर्यादित न रहाता साऱ्या समाजाची 'दुःखद कथने' ठरतात. या अर्थाने ही समाजदर्शनेच असतात. म्हणून दलित आत्मकथनांत 'मी' बरोबर 'आम्ही' ची वेदना असते. या

सामूहिकतेमुळेच दलित आत्मकथनांत सामाजिकता व सांस्कृतिकता प्रत्ययाला येते. कारण व्यक्ती ही त्याच्या समाजाबरोबर व संस्कृतीबरोबर आपल्या जीवनक्रम व्यतीत करत असते. म्हणून या दोन्ही आत्मकथनांतील सामाजिकता व सांस्कृतिकता यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ५.३ निष्कर्ष :

या दोन्ही आत्मकथनांच्या अभ्यासावरून काही निष्कर्ष आपल्या दृष्टिपथास येतात ते पुढीलप्रमाणे –

- एकूण दलित साहित्याला सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ आहे.
- पारंपरिक आत्मकथनांची चौकट या दलित आत्मकथनांनी मोडून काढली.
- दलित आत्मकथने ही स्वकेंद्री नसून समष्टीप्रधान आहेत.
- येथील पुरूषप्रधान व्यवस्था दलित स्त्रियांसाठी अशी दु:खदायक ठरली तशी येथील वर्णव्यवस्था दलित पुरूषांसाठी वेदनादायक ठरली.
- 'अस्तित्व' व 'अस्मिता' या दोहोंचा लढा या आत्मकथनांत प्रत्ययाला येतो.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा या दोन्ही आत्मकथनांत दिसून येते.
- दोन्ही लेखिकांनी दलितत्व झुगारले व शिक्षणाद्वारे आत्मोकर्ष करून घेतला.
- स्त्री आत्मकथनांतून दलित स्त्रीची प्रतिभा प्रखरपणे उभी रहाते. म्हणून पारंपरिक आत्मकथनांत आणि दलित आत्मकथनांत येथे गुणात्मक फरक आढळून येतो. येथे संघर्ष हा एका व्यक्तीचा नसून संपूर्ण घराचा असतो. येथील संघर्ष आपले 'माणूसपण' सिद्ध करण्यासाठी असतो.

- स्त्री आत्मकथनांतील भाषा ही जगण्याची भाषा नसते. जिवंतपणी जगण्याची भाषा असते. ती आपल्या मूळ स्वरूपात जशीच्या तशी येते. म्हणून स्त्रियांच्या आत्मकथनांत ताजेपणा, रांगडेपणा, स्पष्टपणा जाणवतो.

ह्या सर्व बाबीमुळे दलित स्त्रीची आत्मकथने दलित आत्मकथनांतच नव्हे तर मराठी आत्मकथनांत एक आगळीवेगळी व आत्मकथनाच्या दालनात सामाजिक, सांस्कृतिक वाङ्मयीन दृष्ट्या गुणात्मक दृष्टीने मोलाची ठरतात. 'जिणं आमुचं' आणि 'माज्या जल्माची चित्तरकथा' या दोन्ही आत्मकथनांचा सामाजिकता व सांस्कृतिकता या अनुषंगाने विचार केल्यानंतर ही आत्मकथने एक दलित कलाकृती किंवा एक साहित्यकृती म्हणून न रहाता या मर्यादापलीकडे गेलेली दिसतात. केवळ दलित स्त्रियांच्याच नव्हे तर एकंदरीत स्त्रियांच्याा आत्मपर लेखनात सरस ठरावी अशी ही आत्मकथने आहेत. समाज आणि साहित्य या दोन्ही स्तरांवर ती उच्चपातळीवर जातात. इथली स्त्री जिद्दी आहे. आपल्या वाट्याला आलेले वेदनामय व संघर्षमय जीवन यातून शिक्षणाच्या सहाय्याने स्वत: आवर्ताबाहेर पडता पडता आपल्या समाजावरही ती किती चांगल्या पद्धतीने संस्कार करू शकते याचा प्रत्यय या दोन आत्मकथनांद्वारे वाचकांना येतो. आज दलित साहित्याने सामाजिकता व सांस्कृतिकता याबरोबर नैतिकतेचाही केलेला स्वीकार येथे प्रतिबिंबीत होतो. तसेच या दलित स्त्रियांनी निरर्थक असा जीवनप्रवास अधिक वर्तविल्याचे दिसून येते आणि ही सार्थकता, सामाजिकता व सांस्कृतिकता यातील वास्तवाला छेदते. या छेदातून जीवनाचा एक नवा शोध आणि बोध घेता येतो. असा निष्कर्ष ढोबळ मानाने काढता येईल.

-----